
पैसा फिरे गोल गोल!

पैसा काय असतो आणि आपण तो कसा वापरतो




मेल्विन आणि गिल्डा बर्गर

पैसा फिरे गोल गोल!

पैसा काय असतो आणि आपण तो कसा वापरतो





आज मॅक्सचा वाढदिवस आहे.

त्याच्या जॅकमामाने त्याला एक डॉलरची नोट दिली.


मॅक्स खेळण्याच्या दुकानात गेला.
त्याने फुग्यासाठी डॉलरची नोट दिली.



खेळण्याच्या दुकानाची मालकीण बेकरीत गेली. तिथे तिने केकसाठी डॉलरची नोट दिली.



बेकरीचा मालक जॅकच्या पिझ्झाच्या दुकानात गेला. त्याने पिझ्झासाठी डॉलरची नोट दिली.




पैसा गोल गोल फिरला.
जॅककडून, मॅक्सकडे, खेळण्याच्या दुकानाच्या मालकाकडे, बेकरीच्या मालकाकडे, परत जॅककडे.
फुगा, केक, पिझ्झा. आपण आपल्याला हव्या असलेल्या वस्तू पैसे देऊन खरेदी करतो.



प्राचीन काळी पैसा नव्हता. लोक गरजेच्या वस्तू स्वत: पिकवत किंवा बनवत. मग चित्र बदलू लागले. लोक विशिष्ट प्रकारचेच काम करू लागले. काही जण शेती, काही शिकार, काही कापड निर्मिती तर काही लाकूड तोडणी करू लागले. ,

या लोकांना इतर वस्तुंची गरज भासू लागली. म्हणून, त्यांनी देव-घेव पद्धत सुरू केली. जसे, कापडाच्या बदल्यात बटाटे, मांसाच्या बदल्यात मासे, कातड्याच्या बदल्यात जळण.





परंतु देव-घेव पद्धत क्लिष्ट होती. समजा, शेतकऱ्याला कोट हवा आहे. विणकराला गाय हवी आहे. शेतकरी म्हणे, “गाय कोटापेक्षा मौल्यवान आहे. मग कोटच्या बदल्यात गाय कशी द्यायची?” काही लोकांनी शक्कल लढवली. ते म्हणाले, “शिंपल्यांची देवघेव केली तर! शिंपले सगळ्यांना आवडतात. ते किंमती असतात आणि सहजासहजी मिळतही नाहीत.”



कवड्या

लोक शिंपले जमवू लागले. ते गरजेची वस्तू मिळवण्यासाठी शिंपले देऊ लागले.

शिंपल्यांचे दागिने



जे दिले की गरजेची वस्तू मिळते, त्याला *चलन (पैसा)* म्हणतात. सुरुवातीला पैसा म्हणून *शिंपले* वापरले जाऊ लागले.



आता शेतकरी शिंपले देऊन कोट घेऊ लागला. तो विणकराला कोटासाठी तीन शिंपले देऊ लागला. विणकर शिंपले देऊन गाय मिळवू लागला. तो शेतकऱ्याला गायीसाठी दहा शिंपले देऊ लागला.

प्राचीन चीनी लोक शिंपले पैसा म्हणून वापरत. पण काही लोक इतर वस्तू वापरत.

अमेरिकी मूळ निवासी लोक मोती वापरत.



आफ्रिकी लोक मीठाचे खडे वापरत.



मेक्सिकन लोक बिया वापरत.



याप बेटावरील लोक दगडाचे विशाल कडे वापरत.



सांताक्रूझ बेटावरील लोक लाल पीस वापरत.



लोक पैसा म्हणून धातुचा वापरही करत. धातु विविध आकारात आणि रुपात आढळतात.



मेक्सिकोतील कुऱ्हाडीसारखे नाणे



प्राचीन चीनमधील कांस्य धातुचे फावड्या सारखे नाणे


इ.स. सन पूर्व सहाव्या शतकात



किंवा चाकू सारखे नाणे


इ.स. सन पूर्व तिसऱ्या शतकात

धातुच्या नाण्यांचे काही फायदे होते. ती टिकाऊ होती. त्यांना कोणत्याही आकारात घडवता येत होते. नाणे जितके मोठे, तितकीच त्याची किंमत जास्त होती. प्रत्येकाला सोने आणि चांदी यांचा हव्यास होता. हे धातू दुर्मीळ होते. त्यामुळे त्यांची किंमतही जास्त होती.



इजिप्तमधील भित्तीचित्र. किंमती धातू प्रमाण वजनाशी तोलत आहेत.

नाणी प्रथमत: *लिडिया* नावाच्या देशात बनली. आज लिडियाला आपण *तुर्कस्थान* म्हणतो. 2600 वर्षांपूर्वी तिथे नाणी बनायला सुरुवात झाली. याच काळात प्राचीन ग्रीसमध्ये पहिले ऑलिंपिक भरले होते.



नाणी हे नव्या प्रकारचे धातुचे पैसे होते. लिडियातील नाण्यांना *स्टेटर* म्हणत. ही नाणी सोने आणि चांदी यांच्या मिश्रणातून बनत आणि जवळजवळ सारख्याच आकाराची असत. प्रत्येक नाण्यावर सिंहाच्या शीराचे चित्र होते. त्यावरून ती नाणी आहेत, हे ओळखता येई. .



पैसे म्हणून नाणी वापरण्याची कल्पना सर्वत्र पसरू लागली.




लवकरच, चीनने शिंपले वापरणे बंद केले. ते लोहाची नाणी बनवू लागले. पण ती जड आणि मोठी असत. ती जवळ बाळगायला कठीण वाटे.



लोहाची नाणी

1400 वर्षांपूर्वी चीनमध्ये एक नवीन पद्धत सुरू झाली. लोक आपली नाणी दुकानात ठेवू लागले. त्याबदल्यात दुकानदार त्यांना कागदी *नोट* देऊ लागले. त्यावर दुकानात किती नाणी ठेवली, हे लिहिलेले असे.



कालांतराने, चीनी सरकारी कोषागार कागदी नोटा छापू लागले. त्यांनी प्रत्येक नोटेला एक किंमत ठरवून दिली. पुढे ही नोटच चीनचे अधिकृत चलन (पैसा) बनले.

आज प्रत्येक देशाचे आपले स्वत:चे कागदी चलन आहे. त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखतात.

मेक्सिकोचे पेसो



कॅनडाचे डॉलर



इंग्लंडचे पौंड



फ्रांसचे फ्रँक



जपानचे येन



जर्मनीचे मार्क



तैवानचे डॉलर



इटलीचे लिरा



ऑस्ट्रेलियाचे डॉलर



स्पेनचे पेसेटा



संयुक्त राज्य अमेरिकेत कागदी नोटेला *डॉलर* म्हणतात. वेगवेगळ्या किंमतींचे डॉलर एकाच आकाराचे व रंगाचे असतात. जसे, $1, $2, $5, $10, $20, $50, $100.



पूर्वी अमेरिकेत $500, $1000, $10000, $100000 या किंमतीच्या नोटाही होत्या.



डॉलरच्या नोटा *वॉशिंग्टन डी.सी.* येथील मुद्रण विभागात छापतात. तिथे प्रथम स्टील प्लेटच्या नोटा बनवतात. मग त्यांच्यावरून छपाईच्या वेगळ्या प्लेट बनवतात.



छपाईच्या प्लेटवरून छापखान्यात नवे डॉलर छापतात.

डॉलरसारखी हुबेहूब नोट बनवणे कठीण असते. इतर कुणी अशी नोट बनवू नये, याची दक्षता सरकार घेते. नोटेसाठी खास कागद वापरतात. नोटेवर गुप्त रसायनांनी शेकडो बारीक रेषा काढतात.



स्टील प्लेट बनवताना



नोटेचा खास कागद



तपासणी


डॉलरच्या नोटेस बारकाईने बघा.



त्यावर लाल आणि निळ्या रंगाचे धागे दिसतात. आणखी इतर काही गुप्त खुणासुद्धा नोटवर असतात.

डॉलरची नोट एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे जाते.





वर्षभरात, नोट अनेक लोकांच्या हातातून जाते. काही काळानंतर नोट खराब होते, फाटते.



बँका जुन्या नोटा पुन्हा वॉशिंग्टन डी.सी. येथे पाठवतात. कोषागार अशा नोटा जाळून टाकतात. दर दिवशी ते लाखो नोटा जाळून टाकतात.

अमेरिकी कोषागार



वॉशिंग्टन डी.सी. येथे अमेरिकी टाकसाळ आहे. तिथे *पेन्नी, निकेल, डाइम* आणि *क्वार्टर* ही नाणी बनतात.



पूर्वी तिथे अर्धा डॉलर आणि चांदीचा डॉलरही बनत. नाणी नोटांपेक्षा जास्त टिकतात.



नाणी धातुंचे मिश्रण असते. पेन्नी तांबे आणि जस्त यांपासून बनते.



तांब्याची वडी

निकेल, डाइम, क्वार्टर ही नाणी तांबे आणि निकेल यांपासून बनतात.




निकेल धातुचे तुकडे

एक चित्रकार आधी नाण्याची रुपरेखा बनवतो. ही रुपरेखा स्टीलवर कोरून ठसा बनवतात. त्यानंतर धातुंचे मिश्रण बनवतात. या मिश्रणाच्या सळ्या बनवतात. यंत्राने या सळ्यांवर दाब देऊन पट्ट्या बनवतात. पट्ट्या नाण्यांएवढ्याच जाड असतात.




दुसरे एक यंत्र पट्ट्यांमधून नाण्याच्या आकाराचे गोल तुकडे पाडतात.





त्यांच्यावर स्टीलवर कोरुन ठेवलेला ठसा (यंत्राने दाब देऊन) उमटवतात आणि नाणी बनतात.



नाणी बनवण्याचा छापखाना

एक चमकदार निकेलचे नाणे भिंगातून पाहा. अध्यक्ष जेफरसनच्या कॉलरखाली पाहा. FS ही अक्षरे दिसली? ती *फेलिक्स श्लॅग* हे नाव दर्शवतात. नाण्यासाठी जेफरसनचे चित्र काढणाऱ्या कलाकाराचे नाव आहे ते.






डाइम नाण्यावरील अध्यक्ष रुझवेल्टची कॉलर पाहा. JS ही अक्षरे दिसली? ती *जॉन सिन्नॉक* ही अक्षरे दर्शवतात. त्याने रुझवेल्टचे हे चित्र काढले.

लोक वेगवेगळ्या मार्गांनी पैसा कमावतात.



काही मजूरी करून कमावतात.



काही वस्तू विकतात.





काहींना भेटवस्तू म्हणून पैसा मिळतो.

तुम्हालाही पैसा कमवायचा आहे? मग मैदानावरील गवत कापा, रस्त्यावर साचलेला बर्फ गोळा करा, मुलं सांभाळा, कुत्र्यांना फिरवा, बागेतील तण उपटा, मालाची ने-आण करा, जुनी खेळणी किंवा पुस्तके विका.



पैसा कमावण्याच्या इतर मार्गांचाही विचार तुम्ही करू शकता.

कमावलेल्या पैशातून तुम्ही मौजमजा करू शकता. तुम्हाला हवे ते खरेदी करू शकता. अर्थात, मोठ्यांच्या सल्ल्याने.



तुम्ही देणगी देऊन वृद्ध, निराधार लोकांना तसेच आजारी, गरीब मुलांना मदत करू शकता.



तुम्ही चर्च, हॉस्पीटल, वाद्यवृंद, म्युझीयम आणि इतर संस्थांना पैसा देऊ शकता.




तुम्ही पैशाची बचतही करू शकता. साठवलेल्या पैशातून तुम्ही नवीन सीडी/व्हिडिओ प्लेअर, सायकल/स्केटर, पुस्तक/कॉम्प्युटर गेम, जॅकेट/बूट खरेदी करू शकता.





सुरुवातील घरीच पैसे साठवा. ते ठेवण्यासाठी चांगली सुरक्षित जागा निवडा.



काही दिवसांनंतर, तुम्ही साठवलेला पैसा बँकेत जमा करा.



चीनमधील दुकानदार प्राचीन काळी जी पद्धत राबवायचे, तीच पद्धत आज बँका राबवतात. ते तुमचा पैसा ठेवून घेतात. तुम्हाला हवा असेल तेव्हा ते तुमचा पैसा तुम्हाला परत करतात.

बँका तुम्ही ठेवलेला हा पैसा वापरतात. त्यासाठी बँका तुम्हाला अतिरिक्त पैसा देतात. या अतिरिक्त पैशाला आपण *व्याज* म्हणतो. समजा, तुम्ही \$100 बँकेत ठेवले. वर्षभरानंतर, तुम्ही ते काढले तर बँक तुम्हाला \$100 अधिक व्याज देतात.



बँक वर्षभर तुमचा पैसा वापरते. ती हा पैसा इतर लोकांना उधार (कर्ज) देते. लोक बँकेकडून उधारीवर पैसा घेतात. या पैशाने ते घर किंवा गाडी घेतात,



कॉलेजची फी भरतात, प्रवास करतात.




नवा टिव्ही किंवा संगणक घेतात,



न परवडणाऱ्या वस्तू खरेदी करतात.

उधारीवर घेतलेला पैसा बँकेला परत करावा लागतो. त्यासोबत थोडा अतिरिक्त पैसा बँकेला द्यावा लागतो. या अतिरिक्त पैशालाही *व्याज* म्हणतात. समजा, तुम्ही $100 उधार घेतले. वर्षभरानंतर, तुम्ही ते परत केले. बँक तुमच्याकडे $100 अधिक व्याज मागेल.






समजा, तुमचे $100 बँकेत आहेत. तुम्ही एक नवी सायकल खरेदी करणार आहात. सायकलची किंमत $75 आहे.

तुम्ही सायकलची किंमत वेगवेगळ्या तऱ्हेने भरू शकता. तुम्ही बँकेतून $75च्या नोटा काढू शकता.



आणि या नोटा दुकानदाराला देऊ शकता. याला *कॅश* पेमेंट म्हणतात.



किंवा तुम्ही कुणा वयस्कराकडून *चेक* लिहून घेऊ शकता. दुकानदाराला $75 दया, असे चेक बँकेला सांगतो. तुम्ही चेक दुकानदाराला देता. दुकानदार तो बँकेत घेऊन जातो. बँक त्याला $75 देते.



वयस्कर लोक *क्रेडिट कार्ड* वापरतात. या कार्डाने पैसे उधारीवर घेता येतात. दुकानदाराला हे कार्ड दाखवले की तो बिलाची पावती क्रेडिट कार्ड कंपनीला पाठवतो. कंपनी दुकानदाराला $75 पाठवते. मग कंपनी वयस्कर माणसाला $75 चे बिल पाठवते. तो माणूस कंपनीला $75 देतो. कॅश, चेक किंवा क्रेडिट कार्ड. कोणत्याही मार्गाने तुम्ही सायकल खरेदी करू शकता. कोणत्याही मार्गाने दुकानदाराला $75 मिळतात.







पैशाची बचत करा.



पैसा कमवा.



पैसा खर्च करा.



पैसा दान करा.

पैसा गोल-गोल फिरतो.

समाप्त